# मल्हारगड जेजुरी पुरंदर

विनायक पाटील



लेखन - विनायक पाटील, नवी मुंबई .

9821523803

vinayakpatil47@gmail.com



प्रकाशन - ई साहित्य प्रतिष्ठान

मुखपृष्ठ आणि संपादन : सचिन काकडे

www.esahity.com

esahity@gmail.com

eleventh floor, eternity
eaएस. टी. ern express highway
Thane, 400604

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

© esahity Pratishthan®2015

# अर्पण

“ माझ्या सह्यभटकंतीला अगदी मनापासून परवानगी आणि मदत करणाऱ्या माझ्या कुटुंबियांना आणि माझ्या सारखी अनवट वाटेने दुर्ग भ्रमंती करणाऱ्या माझ्या सर्व भटक्यांना हे पुस्तक अर्पण.”

# प्रस्तावना

मल्हारगड जेजुरी पुरंदर तसे पाहता हे तिन्ही गड मोक्याच्या ठिकाणी  वसलेले. प्रत्येकाची आपापली वैशिष्ठ्ये. मल्हारगड म्हणजे स्वराज्यातील सर्वात शेवटचा किल्ला . जेजुर तर महाराष्ट्राचे आराध्य  दैवत खंडोबाचे  स्थान. आणि पुरंदर तर आपल्या शिवशाहीचा तुरा. यांना भेट देण्याची ऒढ  तर खूप दिवसापासून  होती. तसा योग  जुळून आला आणि माझ्या भटकंती मित्राला लागलीच फोन  करून संमती मिळवली.

संपूर्ण  भटकंती मध्ये विशेष मदत मिळाली ती म्हणजे सासवडच्या स्थानिक लोकांची. पुण्याची   आम्हा दोघांनाही या परीसरातील  माहिती नसल्यामुळे  स्थानिक  लोकच खरे आमचे मार्गदर्शक बनले.  त्यातूनच काही चुकले तर सह्याद्री मायबाप होताच.

सर्वकाही नियोजन  केल्याप्रमाणे जुळून आले.  आणि ही दोन दिवसांची भटकंती पार  पडली. याचेच मी प्रवासवर्णन तुमच्या समोर सादर करत आहे.  काही माहिती हवी असल्यास नक्की संपर्क साधा.

तसेच हि माझी पुस्तक रूपातील भटकंती तुम्हा वाचकासमोर आणल्याबद्दल ई-साहित्य टीम चे मनपुर्वक आभार !

खूप दिवस झाले कुठे लांबची भटकंती झाली नव्हती .आता ठरलं One Day return न करता कुठेतरी मुक्काम करायचा . त्यातच मल्हारगड - जेजुरी -पुरंदर हा ब-याच वर्षापासून मनात घुटमळत असणारा ट्रेक होता. म्हणुन सागर (माझा भटकंती मित्र ) ला आधीच विचारने झाले होते . पण कोणत्या न कोणत्या कारणाने हा ट्रेक रद्द होत राहिला . शेवटी मुहूर्त ठरला १५ -१६ ऑगस्ट २०१५.
नेट वरून इत्यंभूत माहिती काढून झाली होती . सागर ने google map वरून सगळी माहिती काढली होती .

१५ ऑगस्ट २०१५ -
सकाळी ४.३० चा गजर लावला होता . पण नेहमीच्या सवयी प्रमाणे पुन्हा मोबाइल चा गजर बंद करून झोपलो पुन्हा उठलो ते डायरेक्ट ५ लाच. सागर चे आधीच २ मिस कॉल येउन गेले होते . कसबसा आटपून तयारी करून घेतली . नशीब Bag आदल्या रात्रीच भरून ठेवली होती . तयारी करून ५ .३० ला घर सोडलं. ५ .४४ ची ऐरोली हून ट्रेन पकडली . आणि धावत पळत ठाणे गाठल . सागर आधीच येउन थांबला होता .




६ .१४ ची इंद्रायणी एक्स्प्रेस पकडायची होती . थोड्याच वेळात ट्रेन आली . १५ ऑगस्ट सुट्टी असल्याने ट्रेन आधीच दादर हून टुम्म भरून आली होती. मी आणि सागर महा युद्ध करत गाडीत चढलो .

आणि आमचा प्रवास चालू झाला .. शिवाजी नगर येई पर्यंत गाडी फुल ते फुलच होती . न बसायला जागा . ८ .२० ला आम्ही शिवाजी नगर ला उतरलो .




ठाणे ते शिवाजी नगर =८० रुपये
उतरल्यावर आधी नाष्टा करून स्वारगेट ला जाणा-या बस मध्ये बसलो. बस मधून जाताना शनिवार वाडा , दगडूशेठ च्या गणपतीचे दर्शन झाले . ट्रेक ची सुरुवार तर गणपतीच्या दर्शनाने मस्तच झाली होती . = शिवाजी नगर ते स्वारगेट =१० रुपये

नंतर स्वारगेट ला उतरून सासवड एस. टी.  ची चौकशी केली . थोड्याच वेळात सासवड एस. टी. आली . लगेच जाऊन जागा पकडली. आणि काळेवाडी तिकीट काढाल २५ रुपये.

गाडी आणि आमच्या गप्पानाही वेग धरला होता .दिवे घाट पार करून आल्यावर कंडक्टर ने काळेवाडी आल्याचा आवाज दिला . काळेवाडी हे पायथ्याचे गाव आहे. पुण्याहून येणा-या साठी . तर सासवड हून येना-या साठी सोनोरी . काळेवाडी हून जवळपास अर्ध्या तासावर मल्हारगड आहे . गावातूनच मल्हारगडाचे दर्शन होत होते . किल्ला लांबुन एखाद्या राजसदरेसारखा सारखा भासत होता .



आमच्या दोघांचीही पुण्यामधली पहिलीच भटकंती होती . रस्त्याच्या दुतर्फा झेंडूची तर कधी टोमॅटो ची शेती होती . मध्ये मध्ये सिताफळीच्या बागाही आपले अस्तित्व दाखवत होत्या. त्याची सख्या देखील या भागात लक्षणीय आहे . मस्त रमत गमत आम्ही डांबरी रस्त्याने चालत किल्ल्याच्या जवळ आलो. इथून खरी चढण चालू होणार होती . पावसाचा इथे लवलेश हि दिसत नव्हता.

महाराष्ट्रामध्ये असणा-या गिरीदुर्गांचा इतिहास पाहता, 'मल्हारगड' हा निर्माण झालेला अखेरचा गिरीदुर्ग. या किल्ल्याची निर्मिती इ.स.१७५७ ते इ.स.१७६० च्या दरम्यान झाली, म्हणजे या गिरीदुर्गाचे वयोमान उणेपुरे अवघे अडीचशे वर्ष. अन्य दुर्गांच्या पंक्तीमध्ये वयोमानानुसार याचे अखेरचे स्थान म्हणून याला अभ्यासक तरुणगड असेही म्हणतात. पायथ्याला असणा-या  सोनोरी गावामुळे या गडाला 'सोनोरी' म्हणूनही ओळखले जाते. मराठेशाहीतील उत्तरार्धात पेशव्यांनी पुण्यातून कारभार सुरु केल्यानंतर, सरदार पानसेंना तोफखान्याचे प्रमुख म्हणून स्वतःच्या कर्तबगारीवर सरदारकी मिळाली. सरदार पानसेंनी स्वराज्य भक्कम करण्यासाठी पुणे आणि किल्ले पुरंदर यांच्या मध्ये पुण्याजवळ किल्ला उभारण्याचे योजले. त्यासाठी त्यांनी क-हेपठरावरील सोनोरी गावाजव ळ डोंगराची निवड केली. दिवेघाटावर लक्ष ठेवण्यासाठी मल्हारगडाची निर्मिती केली गेली. पानसेंनी आपल्या उत्कर्षाच्या काळात या किल्ल्याची



निर्मिती केली परंतु ते आपल्या घराण्याच्या कुलस्वामी खंडेरायाला मात्र विसरले नाहीत किल्ल्याला त्यांनी मल्हारगड असे नाव देवून आपल्या कुलस्वामी प्रती श्रद्धा व्यक्त केलेली आढळून येते.

गावातून किल्ल्यावर जाण्यासाठी अर्धा-पाऊण तास लागतो. विशेष म्हणजे गावाजवळ हा किल्ला असूनही गावातल्या लोकांची किल्ल्यावर फारशी वर्दळ नाही. पर्यटकही इकडे फारसे फिरकत नाही. ज्यांना गि-या रोहणाची, ट्रेकिंगची आणि गडदुर्गावर फिरण्याची आवड आहे, ते लोक मात्र इथे भेटतात.





४५ -२० मिनिटाच्या चढण चढून आम्ही बुरुज पाशी पोहचलो . बुरुज जणू काही सध्याचा काळात बांधला आहे असेच भासत होते . बुरुजाच्या खालून भूयारातून आत किल्ल्यात प्रवेश करता येतो .गडामध्ये प्रवेश करताच, पुढेच एक भगवा दिसतो ... बाजूलाच एक विहीर आहे ... जी जवळ जवळ बूजली आहे ... गडाची तटबंदी ब-या पैकी जिवंत आहे ... तटबंदीच्या बाजूला पिवळ्या फुलांची गर्द झाडी आहे .. तटबंदीच्या बाजूने फिरत फिरत तुम्ही पूर्ण गड पाहू शकता. हि किल्याची मागची बाजू होती .



ह्या किल्ल्याचे वैशिठ्य म्हणजे याची दुहेरी तटबंदी ब-या पैकी शाबूत आहे . थोडा वेळ फोटो काढून सागर आणि मी तटबंदी वरून मुख्य दरवाजा ब घायला गेलो .गडाचा घेर सुमारे एक किमी एवढा आहे. पेशवाईतील तोफखान्याचे मुख्य अधिकारी भीमराव पानसे यांनी या गडाची उभारणी केली . पेशवाईत आपल्या तोफखान्याचा दरारा पानसे यांनी असा वाढविला होता की ,निजाम ,हैदर ,टिपू सुलतान यांना पाळता भुई थोडी केली होती. सरदार पानसेनी किल्ल्यासाठी जागा निवडली ती आपले गाव सोनोरीच्या हद्दितीलच. किल्ले पुरंदरच्या उत्तरेस दिवेघाटाच्या वरच्या तोंडापाशीच. मल्हार गडाच्या नावासंबंधी दंतकथा सांगीतली जाते .-मुहूर्त पाहून गडाचे बांधकाम सुरु झाले .पाया खोदण्यास सुरुवात झली.






खणत असताना एके ठिकाणी कुदळीचा घाव पडला आणि रक्त निघाले .अनेक लोकांना शास्त्रीपंडितांना यासंबंधी विचारले गेले. कोणी काही ,कोणी काही सांगितले .या किल्ल्याच्या जवळच आग्नेय दिशेस खंडोबाचे जागृत देवस्थान जेजुरी आहे . पानसे यांना या खंडोबाची आठवण झाली .त्यांना देवाचा कोपच झाला आहे ,असे वाटले .त्यांनी खंडोबास नवस बोलला ,'गडाला मल्हारी मार्तंडाचे नाव देईन व गडावर तुझे देऊळ बांधीन ' आणि मग रक्त थांबले .बांधकाम पुढे सुरु झाले .याचे बांधकाम ई .स. १७६० ला पूर्ण झाले .

सासवडच्या बाजूने पुण्यात उतरण्यास जो दिवेघाट आहे, त्यावर हा किल्ला सदैव पहारा देत असे .या किल्ल्यांच्या परिसरात गाजलेली अशी लढाई झली नाही ; परंतु किल्ल्यावर शिपाई मावळे ठेवण्यासाठी पेशव्यांनी पानासेंना वर्षाला ३००० रु .मंजूर केल्याचे कागदोपत्री आढळते .तसेच ई. स. १७७१ते ७२ च्या सुमारास श्रीमंत थोरले माधवराव पेशवे हा गड बघण्यासाठी आले असल्याची नोंदही आढळते .इंग्रजाविरुद्ध केलेल्या बंडाच्या वेळी उमाजी नाईक व वासुदेव बळवंत फडके हे क्रांतिवीर या गडाच्या आश्रयास आले होते .



थोडे चालून गेल्यावरच महादरवाजा आणि बुरुज लागतो दोन्ही सुस्थित शाबूत आहेत . गडावर स्वच्छता मात्र मस्त होती .गडावर पाण्यासाठी विहिरी व एक बांधीव तलाव आहे येथील तलावातच पावसाळ्यात फक्त पाणी दिसते .उन्हाळ्यात तलाव कोरडा पडतो.



पडक्या इमारतीची जोडी दृष्टीस पडतात .मात्र ,ज्या मल्हारीच्या नावे हा गड आहे ,त्याचे देवालय शाबूत आहे. शेजारचे महादेवाचे मंदिरही उत्तम स्थितीत आहे .गडावर बालेकिल्ला असून ,त्याच्या तटबंदीची पडझड झाली आहे . गडावरून पुरंदर,वज्रगड ,जेजुरी ,जाधवगड ,कानिफनाथाचे स्थान ,दक्षिणेस सासवड ,तर उत्तरेस लोणी ,काळभोर -थेउरचा परिसर दृष्टीस पडतो .







गड बघण्यास गेल्यानंतर भीम पराक्रमी भीमराव पानसेचे सोनोरी उर्फ प्राचीन सोनपुरी हे पायथ्याचे गावही बघायला हवे .तेथे त्यांचे स्मारक आहे.पण वेळे अभावी आम्ही गडफेरी आटोपती घेतली . आणि गड उतरायला लागलो . पुन्हा काळेवाडी कडे येनता मस्त भूक लागल्यामुळे शेतातली टोमॅटो हादडत ,घरचा खाऊ खात आलो . ऐका भल्या Bike वाल्याने गावापर्यंत लिफ्ट दिल्याने अर्धा तास वाचला आमचा आणि लगेच आम्ही काळेवाडीत आलो .
गावातच आल्यावर लगेचच टमटम उभी होती चौकशी करून सासवड जाण्यासाठी बसलो . काळेवाडी ते सासवड १० रुपये.
आता पुढील लक्ष होत श्री मार्तंड देवस्थान जेजुरी.







सासवड ला उतरून एस. टी. स्टॅन्ड मध्ये एस. टी. ची चौकशी केली तेव्हा बाहेर जेजुरी जेजुरी म्हणुन वडाप वाला ओरडत होता. वेळ वाचवा म्हणून आम्ही वडाप च्या जीप मधून निघालो . खूप दिवसांनी जीप मध्ये बसत होतो . जवळपास जीप मध्ये २५ जन होतो . hats off to that driver.



१ /२ तासात आम्ही जेजुरी ला पोहचलो . सासवड ते जेजुरी २० रुपये वडाप ने.

उतरताच क्षणी जेजुरी गड दृष्टी क्षेपात पडतो.

बोला " येळकोट येळकोट जय मल्हार "...!!!
देवा सदानंदाचा विजय असो...!!!
मल्हारी मार्तंड जय मल्हार...!!!
सोन्याची जेजुरी...!!!







श्री क्षेत्र जेजुरी सह्याद्री च्या कुशीत वसलेले गाव साक्षात मल्हारीच येथे नांदतो आहे.श्री शंकराने मार्तंड भैरव अवतार इथेच धारण केला. दक्षिणे मध्ये मणि मल्लाचा संहार केल्या नंतर आपली राजधानी ही येथेच वसवली. मार्तंड भैरवाच्या मुळ अवतार ठिकाणाला म्हणजेच सह्याद्री च्या या डोंगररागांना जयाद्री नाव लाभले. आणि काळाचे ओंघात त्याचे जेजुरी झाले.

या मल्हारीस हळद प्रिय म्हणून येथे येणारा प्रत्येक भक्त मुक्त हाताने हळदचूर्ण उधळीत असतो, उत्सवा मध्ये तर सारा आसमंत व परिसर भंडाराने सुवर्णमय होतो म्हणूनच जेजुरीला सुवर्णनगरी म्हटले जाते.



चालत ऐका बाजारपेठेतून आम्ही जेजुरी गडाकडे निघालो .रस्त्याच्या दुतर्फा असणारे हळदीचे डोंगर लखख जाणीव करून देत होते कि आम्ही जेजुरी मध्ये आलो आहोत. १५ ऑगस्ट आणि त्यात शनिवार असल्यामुळे भाविकांची खूप गर्दी होती .

१० मिनिटातच आम्ही पहिल्या प्रवेशद्वारापाशी पोहचलो.

जेजुरी गावाच्या दक्षिणेकडील डोंगरावर साधारणपणे पंच्याहत्तर मीटर उंचीवर मल्हारी-मार्तंडाचे मंदिर आहे. मंदिराला पूर्व, पश्चिम व उत्तर अशा तीनबाजूनी पायरीमार्गांनी जाता येते. त्यापैकी पूर्व व पश्चिमेकडील पाय-या अरुंद व अर्धवट बांधकाम स्थितील असल्याने त्यांचा वापर सहसा होत नाही. उत्तर दिशेकडील पायरी मार्ग रुंद व रहदारीचा असल्याने या पायरी मार्गाची शोभा अनेक भाविक भक्तांच्या नवस पुर्तीतून

निर्माण झालेल्या कमानी व दीपमाळांनी वाढविली आहे. या पायरी मार्गावर तीनशे पंच्याऐंशी पाय-या आहेत तर सुस्थितील चौदा कमानी व छोट्या मोठ्या तीनशे दीपमाळा आहेत.



जेजुरगडाला नवलाख पायरीचा उल्लेख अनेक लोकगीतांमधून येत असल्याने अनेक भाविक भक्तांच्या मनात कुतूहल निर्माण होते, परंतु गड बांधणी दरम्यान वा परण्यात आलेल्या चिरा ( दगड ) संदर्भात हा उल्लेख आलेला आहे.

पायरी मार्गाची सुरुवात पंचखांबी मंदिरातील नंदी दर्शनाने होते व पुढील मार्गावर आद्य क्रांतिवीर उमाजी नाईकांचा पुतळा ज्यांनी जेजुरीगादाचे रक्षण इंग्रजापासून केले व वीरभद्र, बानुबाई मंदिर, हेगडी प्रधान, यशवंतराव इ. अनेक छोटी मोठी मंदिरे लागतात.

नंतर मात्र माझी छाती अभिमानाने फुलून गेली कारण हि तसेच होते. शहाजीराजे व शिवराय यांचा जेजुरी गडावरील भेटीचा प्रसंग . खरच मन आपोआप नतमस्तक होते तिथे आल्यावर . मनापासून त्या मुर्तीकाराचे कौतुक करावेसे वाटते .



नंतर सागर कडून माहिती कळली कि कार्यवाहूमुळे शहाजीराजांचा बराचसा काळ कर्नाटकातच व्यतीत होत होता. मात्र, त्यांच्याही कानावर पुत्र शिवबाच्या कीर्तीचा डंका निनादत होता. सर्वच कुटुंबियांना एकमेकांच्या भेटिची ओढ  लागली होती. त्यामळे शहाजीराजांनी कुटुंबाच्या भेटिचे मनावर घेऊन बँगळूर सोडले. मजल दरमजल करीत, तीर्थक्षेत्रांना भेटी देत ते आपल्या घोडदळ-पायदळासह पुण्याकडे येत होते. त्यावेळी शिवरायांना पकडण्याच्या हेतुने शाहिस्तेखान पुण्याच्या लाल महालात तळ ठोकून बसला होता. त्यामुळे शहाजीराजे आणि शिवराय यांची भेट जेजुरीत होणे हिताचे होते.

बऱ्याच वर्षानंतर मुखावलोकन करायचे झाल्यास ते एखाद्या तीर्थक्षेत्री करावे, असा धार्मिक संकेत असल्यामुळे शिवरायांनीही जेजुरीतच वडिलांची भेट घ्यायचे ठरवले. शहाजीराजे जेजुरीला येताच त्यांनी गडावर जाऊन खंडोबाचे दर्शन घेतले. आज ज्या ठिकाणी ' अडिच पायऱ्या ' आहेत, त्या ठिकाणी पितापुत्राने भेट घ्यायचे ठरले. प्रथम एकमेकांकडे न पहाता साजुक तुपाने भरलेल्या काशाच्या परातीत शहाजीराजे व शिवरायांनी पाहिले. आनंदित झालेले परस्परांचे चेहरे दोहांनाहि दिसले. नंतर, शिवरायांनी नम्रपणे आपले मस्तक शहाजीराजांच्या चरणावर टेकवले. पितापुत्राने एकमेकांना कडकडून मिठी मारली. शहाजीराजे व शिवराय यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू तरळले.. असे झाले शहाजीराजे आणि शिवरायांचे ' मुखावलोकन ' .



नंतर आम्ही जेजुरी गडावर पोहचलो.
महाद्वारातून गडावर प्रवेश केल्यानंतर समोर दिसतात त्या उंचच उंच चार भव्य दीपमाळा व मुख्य श्रीखंडोबा-म्हाळसा मंदिर. दीपमाळांच्या डाव्या बाजूने पुढे गेल्यानंतर तटबंदीला टेकून उभी असलेली भव्य मल्लासूर दैत्याची मूर्ती पहावयास मिळते, तर त्याचे समोरच दगडी बांधकामातील गाडी बगाड पहावयास मिळते.त्याच्याच पुढे पश्चिमेकडे मंदिराकडे तोंड असलेल्या नंदीपुढे पितळी कासव दिसते, बहुदा सर्व हिंदू मंदिरात कासव पहावयास मिळते परंतु इतके भव्य सहा मीटर व्यासाचे कासव फक्त जेजुरीतच दिसते.

१५ ऑगस्ट असल्यामुळे दर्शनासाठी प्रचंड गर्दी होती. रांगेत उभ राहिलो तर दर्शनासाठी ३ ते ४ तास लागणार होते.त्यामुळे दर्शन पासाची काही सोय आहे का हे पाहयला गेलो.अवघ्या प्रत्येकी ५० रुपयात फ़क्त तीन मिनीटात दर्शन अस ट्रस्टच्या वतीने लावलेल्या बुथवर एकजण बोंब ठोकत होता. वेळ ब-या पैकी असल्यामुळे आम्ही नॉर्मल लाईनने दर्शन घ्यायचे ठरवले . जवळपास ४.३० तास लाऊन दर्शन घेतले पाय ओरडत नव्हते तर शिव्या घालत होते. असो ..

खंडोबाच्या मुख्य मंदिरात प्रवेश केल्यावर ,प्रथम लागते ती सदर, या ठिकाणी उजव्या हाताला उत्तरेकडे उंचावर दोन घंटा बांधलेल्या आहेत. सदरेवरून मंदिरामध्ये प्रवेश करण्यासाठी साडेचार फुट उंचीचा चांदीचा दरवाजा लागतो. मध्य गर्भगृहात उत्तर व दक्षिण दिशेस दोन दगडी घोडे दिसतात पैकी उत्तरेकडील घोड्यावर स्वार झालेल्या खंडोबाची मूर्ती दिसते. तसेच उत्तर व दक्षिण बाजूस दोन दरवाजे दिसतात त्यापैकी गर्दीच्या काळामध्ये मंदिरामध्ये प्रवेश करण्यासाठी दक्षिणेकडील दरवाजाचा वापर केला जातो. मुख्य गर्भगृहाच्या दरवाजाच्या उजव्या हाताला संगमरवरी यक्षाची मूर्ती दिसते तर डावीकडील बाजूस दगडात कोरलेला गणपती आहे.मुख्य गर्भागृहाम्ध्ये प्रवेश करताना समोर दिसतो तो मेघडंबरीतील भव्य मोठा देव्हारा. समोर खालील बाजूस श्रीखंडोबा व म्हाळसा स्वयंभूलीग दिसते, श्रीखंडोबा स्वयंभूलिंग हे म्हाळसा स्वयंभू लिंगापेक्षा आकाराने मोठे आहे, त्याला लागुनच पाठीमागील बाजूस बाणाईचे लिंग आहे,



सर्व मंदिराचे दर्शन घेऊन आणि संध्याकाळ झाल्यामुळे कडे पठाराला दुरूनच नमस्कार करून आम्ही गड उतरू लागलो.

एव्हाना ७ वाजले होते . १ -२ दुकानदाराकडे राहण्याची चौकशी करून कैलाश लान्ज मध्ये ३०० रुपये देऊन एक रात्र राहण्याची रूम बुक केली .

मस्त रात्री समोरच्याच ऐका वेज हॉटेल मध्ये थाली वर मजबूत ताव मारला . आणि रूम वर येउन अंग धरणी मातेकडे स्वाधीन केल .

कानावर बाजूलाच चालू असणाऱ्या गोंधळाचे मस्त स्वर कानावर पडत होते . अन डोळ्यासमोर चित्र तरळत होते उद्याचे लक्ष - शिवशाहीचा तुरा किल्ले पुरंदर.

१६ ऑगस्ट २०१५
सकाळी ५ .३० लाच जाग आली. बाजूच्या घरात चालू असलेला खंडोबाचा गोंधळ संपत आला होता तर जेजुरी गडावरील काकड आरतीचे स्वर कानावर येत होते .
कालच्या दिवसभराच्या त्रासाने मला झोप मस्त लागली होती . पण माझ्या घोरण्यामुळे सागर मात्र रात्रभर झोपू शकला नाही. सकाळचे प्रांत विधी आटपून आम्ही ६ .३० च्या सुमारास हॉटेल सोडलं . जेजुरी गाव नुकतच उठत होत . हवेत गारवा जाणवत होता मात्र पावसाचा लवलेश नव्हता.
सरळ आम्ही जेजुरी बस स्थानक गाठल . थोड्याच वेळातच सासवड एस. टी.  आली . जेजुरी ते सासवड एस. टी.  तिकीट = २० रुपये

सासवड ला ७ .३० ला आलो . चहा नाश्ता करून स्टॅन्ड वर आलो . पुरंदर ला नारायणपूर गाडी जाते इतकच माहित होत . परंतु स्टॅण्ड वरच्या लोकांना विचारल्यावर कळल कि नारायणपूर गावात न जाता जर नारायणपूर फाट्यावर उतरलो तर जवळ पडेल . खरच खूप वेळा google किंवा map पेक्षा स्थानिक माणसच खूप उपयोगी पडतात.
त्यानुसार आम्ही भोर गाडी पकडली . आम्हाला नारायणपूर फाट्याला उतरायचं होत तस कन्डक्टर ला सांगितलं हि होत .सासवड ते नारायणपूर तिकीट १२ रुपये.



आता मात्र जबरदस्त ओढ लागली होती ती स्वराज्याच्या पुरंदर भेटीची , ज्या भूमी वर धाकल्या धनीचा संभाजी महाराजांचा जन्म झाला होता , जिथे हिंदवी स्वराज्याची पहिली जडण घडण झाली होती तो शिवशाहीचा तुरा म्हणजे किल्ले पुरंदर . मुरारबाजींच्या पराक्रमाची साक्ष आणि इतिहास प्रसिद्ध तह जिथे झाला तो पुरंदर . अशी ऐक न अनेक इतिहासाची पाने मनात उलगडत होती . प्रत्येक डोंगर पाहताना हाच का पुरंदर हाच का वज्रगड असा प्रश्न मनात उठत होता .
साधारण ४५ मिनिटांनी कन्डक्टर काकांनी नारायण फाटा आल्याची घोषणा केली . बस मधली लोक तर आम्हाला अशी बगत होती कि आम्ही एलिअनच आहोत .असो ..

फाट्यावर उतरताच दिशादर्शक पाटी दिसते . पुरंदर आणि वज्रगडाकडे --->

गड समोरच दिसत होता . अथांग .. .प्रचंड .. धुक्यात वेढलेला .. बाजूला मस्त भाताची शेती होती . बाकी पुण्यात कुठेहि नसलेला पाउस मात्र इथे खूप कोसळत होता .
हे आम्हला इथल्या शेतावरून आणि दुथडी भरून वाहणाऱ्या वड्यावरुनच समजत होते .







आमचे फोटो सेशन चालू होते .सागर भाऊ मधला फोटो ग्राफर आज चांगलाच फोर्मात आला होता . चिखलाचे , गवतावर पडलेल्या दवाचे , शेतांचे , ओढ्याचे मस्त क्लिकक्लिकाट चालू होता .

थोड चालून गेल्यावर विचारल्यावर कळल कि डांबरी रस्त्याने ५ km वाट आहे तर डोंगरातून गेल्यावर २ km. तसपण डांबरी वाट ही आमची वाट नव्हती. सोप्या वाटेने जायचं नाही हा
गुणधर्म प्रत्येकाच्या अंगी होता.

किल्ल्याची चढण ब-या पैकी दमछाक करणारी आहे. पण निसर्गराजाने साथ दिल्याने पूर्णवेळ आकाश अभ्राच्छादित राहिलं. पण १ /२ तस चढाई करून गेल्यावर कळल कि आम्ही वाट चुकलो आहोत . ज्या वाटेने आम्ही चाललो होतो ती ऐका धबधब्याची होती . आणि ज्याला आम्ही पायाचे निशाण समजत होतो ते मुळात गुरांच्या पायाचे निशाण होते. आजूबाजूला हि कोण नव्हत . वरून गडावर जाणा-या गाड्यांचे आवाज येत होते पण वर जाण्याचा मार्ग काही सापडत नव्हता . पावसामुळे वाटाही अस्पष्ट झाल्या होत्या .मग आम्ही सरळ कसली वाट आहे याची पर्वा न करता वरच्या दिशेने जायचं ठरवलं . कसे बसे काट्या झुडुपातून १ तासाच्या अथक प्रयत्नाने डांबरी रस्त्याला आलो. man vs wild मधल्या bear grylls ला जेव्हा शेवटी वाट सापडल्यावर आनंद होतो तसाच आनंद आम्हाला झाला . आता मात्र जास्त शहाणपना न करता डांबरी रस्त्यानेच जायचं ठरलं .



वाटेत ऐका गाडी वाल्याने लिफ्ट दिली आणि आम्ही पहिल्या प्रवेशद्वारापाशी आलो . किल्ला पुर्णपणे आर्मीच्या ताब्यात आहे . पहिल्या चेकपोस्ट पाशी ओळखपत्र चेक केली जातात . बाइक ला हॅलमेट शिवाय परवानगी नाही . गडाच्या आसमंतात प्रवेश करतानाच लष्कराच्या अस्तित्वाची जाणिव झाली. तिथे उपस्थित लष्करी जवांनांनी वज्रगडावर जाण्याची परवानगी नाही असे सांगुन धक्का दिला. "हमारे जैसाही एक जवान होगा उस रास्तेपे, जो आपको आगे नही जाने देगा" असे सांगत त्याने आमची दांडी उडवली.असो..

या गडाचे सर्वात महत्वाचे वैशिष्टये म्हणजे शिवरायांचा, महाराष्टाचा, स्वराज्याचा पहिला युवराज व दूसरा छत्रपती संभाजी राजे यांचा जन्म महाराणी सईबाई साहेब यांचे पोटी सन 14 मे 1657 रोजी झाला. ज्योतिषाने त्यांचे भविष्य वर्णन केले. "हा उंच डोंगरी किल्यावर

राहील, शिवासारखे तांडव करेल, शत्रूच्या उरात धडकी भरवेल, हा भिम पराक्रम करेल." हे शब्द खरे ठरले. शंभूराजांची ही जन्मभूमी पावन झाली.

पुरंदर म्हणजे इंद्र. ज्याप्रमाणे इंद्राचे स्थान बलाढ्य तसाच हा पुरंदर. पुराणात या डोंगराचे नाव आहे 'इंद्रनील पर्वत'. हनुमंताने द्रोणागिरी उचलून नेत असताना त्या पर्वताचा काही भाग खाली पडला तोच हा इंद्रनील पर्वत. बहामनीकाळी बेदरचे चंद्रसंपत देशपांडे यांनी बहामनी शासनाच्या वतीने पुरंदर ताब्यात घेतला. त्यांनी पुरंदरच्या पुनर्निर्माणास प्रारंभ केला. त्याच घराण्यातील महादजी निळकंठ याने कसोशीने हे काम पूर्ण केले. येथील शेंदऱ्या बुरूज बंधाताना तो सारखा ढासळत असे. तेव्हा बाहिरनाक सोननाक याने आपला पुत्र नाथनाक आणि सून देवाकाई अशी दोन मुले त्यात गाडण्यासाठी दिली. त्यांचा बळी घेतल्यावरच हा बुरूज उभा राहिला. हा किल्ला सन १४८९ च्या सुमारास निजामशाही सरदार मलिक अहमद याने जिंकून घेतला. पुढे शके १५५० मध्ये तो आदिलशाहीत आला.

इ.स. १६४९ मध्ये आदिलशहाने शहाजीराजांना कैदेत टाकले. त्याच वेळी शिवाजी महाराजांनी अनेक आदिलशाही किल्ले आपल्या ताब्यात घेतले. म्हणून शिवरायांचा बंदोबस्त करण्यासाठी आदिलशहाने फत्तेखानास रवाना केले. परिस्थिती फारच बिकट होती. एकीकडे आपले वडील कैदेत होते तर दुसरीकडे फत्तेखानाच्या स्वारीमुळे स्वराज्य धोक्यात येणार होते. महाराजांनी यावेळी लढाईसाठी पुरंदर किल्ल्याची जागा निवडली. मात्र यावेळी गड मराठ्यांच्या ताब्यात नव्हता. महादजी निळकंठराव यांच्या ताब्यात किल्ला होता. त्यांच्या भावभावांमधील भांडणाचा फायदा उठवून महाराजांनी किल्ल्यात प्रवेश करण्यात यश मिळवले. या पुरंदर किल्ल्याच्या साहाय्याने मराठ्यांनी फत्तेखानाशी झुंज दिली आणि लढाई जिंकली. शिवाजी महाराजांना या पहिल्या लढाईतच मोठे यश प्राप्त झाले. सन १६५५ मध्ये शिवाजीराजांनी नेताजी पालकर यास गडाचा सरनौबत नेमले.

१६६५ मध्ये मोगल सरदार जयसिंगाने पुरंदराला वेढा घातला. या युद्धाचे वर्णन सभासद बखरीमध्ये असे आढळते.'तेव्हा पूरंधरावरी नामजाद लोकांचा सरदार राजियाचा मुरारबाजी प्रभू म्हणून होता. त्याजबरोबर हजार माणूस होते. याखेरीज किल्ल्याचे एक हजारे असे दोन हजारे लोक होते. त्यात निवड करून मुरारबाजी याने सातशे माणूस घेऊन ते गडाखाली दिलेरखानावरी आले. दिलेरखान तालेदार जोरावर पठान पाच हजार याखेरीज बैईल वगैरे लोक ऐशी गडास चौतरफा चढत होती. त्यात होऊन सरमिसळ जाहले. मोठे धूरंधर युद्ध झाले.

मावळे लोकांनी व खासां मुरारबाजी यानी निदान करून लढाई केली. पाचशे पठाण लष्कर ठार झाले. .' मुरारबाजी देशपांडेचे हे शौर्य पाहून दिलेरखान बोलिला,'अरे तू कौल घे. मोठा मर्दाना शिपाई तुज नावाजितो.' ऐसे बोलीता मुरारबाजी बोलिला, 'तुझा

कौल म्हणजे काय? मी शिवाजी महाराजांचा शिपाई तुझा कौल घेतो की काय?' म्हणोनि नीट खानावरी चालिला. खानावरी तलवारीचा वार करावा तो खानने आपले तीन तीर मारून पुरा केला. तो पडला. मग खानाने तोंडात आंगोळी घातली, 'असा शिपाई खुदाने पैदा केला.'

खानाने वज्रगड ताब्यात घेतला आणि पुरंदरावर हल्ला केला व पुरंदर माचीचा ताबा घेतला. माचीवर खानाचे आणि मुरारबाजीचे घनघोर युद्ध झाले. मुरारबाजी पडला आणि त्याच बरोबर पुरंदरही पडला. हे वर्तमान जेव्हा राजांना कळले तेव्हा त्यांनी जयसिंगाशी तहाचे बोलणे सुरू केले आणि ११ जून १६६५ साली इतिहासप्रसिद्ध 'पुरंदरचा तह' झाला. यात २३ किल्ले राजांना मोगलांना द्यावे लागले.

गडावर पाऊस जास्त झाल्यामुळे सर्वत्र चिखलाचे साम्राज्य उभे होते . १० वाजले होते तरीपण सर्वत्र धुके होते . गडावर सुरुवातीलाच रणझुंजार किल्लेदार वीर मुरारबाजींचा आवेशपूर्ण पुतळा आहे पुर्णाकृती पुतळा दोन हातातल्या दोन तलवारी सरसावून जणु काही काही काळाला आव्हान देत आपल्याही शरीरात रक्त आहे आणि ते सळसळू शकते याची सुखद जाणीव करुन देत आपले स्वागत करतो. समोर आलेल्या गनीमाची पाचावर धारण बसली असणार हे नक्की. पुतळ्यासमोर उभं राहिलं तर उजवीकडची वाट वर बालेकिल्ल्याकडे जाते आणि दुसरी वज्रगडाकडे. खालून येणारी गाडीवाट पुतळ्याकडे येऊन वज्रगडाला जाणा-या  वाटेला मिळते. पुतळ्याचे रौद्ररूप डोळ्यात साठवून आणि वीर मुरारबाजींच्या पराक्रमाच्या स्मृती मनात घोळवीतच गडदर्शनाला आम्ही पुढे निघालो.



पुढे बिनी दरवाज्यात पोहोचलो. दरवाजावरून वळणे घेत येणारी गाडीवाट सुंदर दिसते. मागे एक जुना चर्चदेखिल आहे. चर्च मात्र पडक्या अवस्थेत आहे.



वाटेत पडिक अवस्थेतले निवासी बंगले आहेत. पुरंदरेश्वराचे यादवकालीन मंदिर आहे. तिथेच थंड पाण्याचे टाके आहे. नंतर माचीवर आर्मीची चौकी आहे तिथे मोबाईल आणि कॅमेरा जमा करावे लागतात . बाकी पूर्ण गडावर फोटो बंदी आहे . आता हि बंदी किल्याच्या संरक्षणासाठी आहे कि आर्मीच्या हे मात्र कळत नाही .

असो उजव्या बाजूला शिवरायांचा एक अर्धपुतळा प्रतिष्ठापीत केलेला आहे. चोरांनी महाराजांना देखील सोडलेले नाही. महाराजांच्या डोक्यावरील छत्र गायब आहे. वर मात्र खाडी चढण आहे . पुढे काही पडक्या वाड्याचे अवशेष लागतात .

अधूनमधून पावसाचा मारा होत होता पण शिण पळून जात होता. पुरंदरचा बालेकिल्ला राजगडच्या बालेकिल्ल्यापेक्षा कमी उंचीवर आहे आणि चढणही सोपी आहे. चढण संपली की दिल्ली दरवाजा आहे. दिल्ली दरवाजातून वर आलं की अजून एक दरवाजा आहे. दरवाजाच्या भिंतीवर रंगाने कल्याण दरवाजा असं लिहीलं आहे .

कल्याण दरवाजासमोर खंदकडा आहे. खंदकड्याच्या अगदी टोकावरून वज्रगड, पुरंदर-वज्रगड मधली भैरवखिंड, काही बंगले, राजाळ तळे असे विहंगम दृष्य दिसते. खंदकड्यावर काही झाडीत झाकल्या गेलेल्या विहीरी आहेत. खंदकड्याच्या टोकावर बुरुज आहे. तिथे थोडावेळा विश्रांती घेऊन पोटपूजा करून कल्याण दरवाजाकडे आलो. कल्याण दरवाजातून आत येऊन थोडं पुढं आलं की राजगादी टेकडी आहे. येथे संभाजी महाराजांचा जन्म झाला होता. मोठ्या उत्साहाने टेकडी वर चढून गेलो पण वरती एका बाजूला भक्कम तटबंदीखेरीज काहीच बांधकाम शिल्लक नव्हतं.

खाली येऊन तसंच पुढं गेलं की केदार टेकडी आहे. त्यावर केदारेश्वराचं पुरातन मंदीर आहे. राजगादी टेकडीवरून केदारेश्वराचं दर्शन घेणारी शिवराय आणि शंभूची जोडी क्षणभर डोळ्यासमोर तरळून गेली. केदार टेकडीवर फक्त केदारेश्वर

मंदीर आहे जणू त्या मंदीरासाठीच ती टेकडी तिथे आहे. मंदिर तसं लहान आहे पण रेखीव आहे. समोर नंदी आणि एक दीपमाळ आहे. महाशिवरात्रीला येथे भाविकांचा पूर येतो.



वरूणराजाने काही वेळासाठी आमची रजा घेतली. आणि मंदिराच्या दगडी व्हरांड्यात आम्ही पहुडलो. जगात सर्वात सुंदर काय असेल तर निसर्ग. पाय निघत नव्हता पण परत तर जायचंच होतं जीवनाच्या रहाटगाडग्याला जुंपून घेण्यासाठी. केदारटेकडी वरुन पुढे दरी दिसत होती पण धुक्याच साम्राज असल्यामुळे काहीच दिसत नव्हते .

आता वेळेअभावी आम्ही काढता पाय घेतला .परत येताना परत मुरारबाजींच्या पुतळ्याचे दर्शन घेतले . त्यांचा तो आवेश शब्दात वर्णन करणे कढिणच.

पुरंदर किल्ला भारतीय सैन्य दलाच्या ताब्यात आहे त्यामुळे जागोजागी चेकिंग चालू असते. तेव्हा स्वतःची ओळखपत्रे आणि हेल्मेट आवश्यक. गडावर सैनिक असल्याने फिरणे एकदम सुरक्षित आहे. गडावर टवाळी, छेडछाड असले प्रकार होत नाहीत.
गडावर प्यायचे पाणी आहे. पुरंदरेश्वर मंदिराच्या बाजूला चहा नाश्ट्याची पण सोय आहे. मात्र केदारेश्वरला जातान पाण्याची बाटली सोबत असू द्यावी. पण किल्ल्याची काळजी मात्र काहीच घेतली नाही आहे. किल्यावर शिवाजीमहाराजांच्या इतिहासापेक्षा आर्मिलाच जास्त महत्व दिले आहे. जागोजागी बुरुज कोसळले आहेत. दरवाजे शेवटचे घटका मोजत आहेत आणि आर्मी चे बंगले मात्र आलिशान पद्धतीने उभे आहेत.



परतीच्या प्रवासात ऐका पुण्याच्या माणसाने लिफ्ट दिली त्यामुळे डायरेक्ट आम्ही पायथ्याच्या गावात आलो .

पुढे ऐका डम्पर ने लिफ्ट दिली आणि आम्ही सासवड ला पोहचलो .



सासवड ला येउन पेटपूजा केली आणि पुण्याला जाऊन मुंबई ची गाडी पकड्याचे ठरवले परंतु तेवढ्यातच दहिवडी -फलटण - मुंबई एस. टी.  आल्यामुळे डायरेक्ट मुंबई गाठायचे ठरवले . गाडी फुल होती म्हणून सीटच्या मधल्या जागे वर आम्ही भारतीय बैठक मारली .
आता मात्र २ दिवस दडी मारून बसलेला पाऊस मनसोक्त कोसळत होता . आणि आम्ही २ दिवसाची भटकंती संपउन शहराची वाट धरत होतो.

खरच मुंबई -पुणे - मल्हारगड -सासवड -जेजुरी -सासवड -पुरंदर या २ दिवसाच्या भटकंती ने खूप काही शिकवले होते .
खूप रानवाटा धुन्धाळल्या होत्या . ग्रामीण भागाशी अगदी जवळून संपर्क आला होता . २ दिवस महाराजाच्या मुलुखात घालवल्यानंतर पाय घरी निघत नव्हते पण नाईलाज होता .

आयुष्भर पोटापाण्याच्या उठाठेवी करत असलो तरी ह्या सह्याद्री च्या प्रेम पोटी असाच पुन्हा पुन्हा सह्याद्रीच्या कुशीत येत राहीन . पुन्हा नव्या भटकंती साठी . नव्या वाटावर चालण्यासाठी, नवे डोंगर पालथे घालण्यासाठी .सह्याद्रीचे वारे पुन्हा पुन्हा अंगावर घेण्यासाठी.

दिसूं लागले डोंगर जरा मिटता लोचन
तिथें कुणी तरी मला नेऊं लागलें ओढून
खळखळणारी पानें ... दूर पळणा-या  वाटा
वाटांसवें त्या पळालों सारें काहीं झुगारून
एक ‘जिप्सी’ आहे माझ्या खोल मनात दडून...!! ई साहित्य प्रतिष्ठान

कुठलीही भाषा चांगली किंवा वाईट नसते. आपली भाषा ती आपली भाषा. जशी दोन मातांची तुलना करता येत नाही तशी दोन मातृभाषांचीही करू नये. आपण आपली भाषा समृद्ध करण्यासाठी काय करता येईल ते करावे. बस्स.

तर तसे अनेक चांगले मराठी लोक चांगलं काही करायचा प्रयत्न करत असतात. काही चांगले लोक चांगलं मराठी लिहायचा प्रयत्न करत असतात. आणि हे चांगलं जास्तीत जास्त मराठी लोकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न आम्ही करतो. दर महिन्याला डझन अर्धा डझन पुस्तकं प्रकाशित करतो. ती सुमारे तीन लाख  वाचकांपर्यंत पोहोचवतो. आजवर हजाराच्या घरात पुस्तकं प्रकाशित केली आहेत.

यावर खुष व्हावं. अजिबात नाही.

बारा कोटी लोकांची भाषा मराठी. त्यातले निदान सहा कोटी साक्षर.

आणि वाचक किती? तीन लाख?

बहुत नाइन्साफ़ी है.

मराठीतला प्रत्येक साक्षर वाचक व्हायला हवा. मोबाईलचा वाढता प्रसार आणि इंटरनेटचा वाढता व्याप पहाता, हे शक्य आहे. होय. हे शक्य आहे.

मराठी ई बुक्स चे वाचक कोटीच्या संख्येत असायला हवेत.

हे कोण करणार?

तुम्ही!

तुतुम्ही आपल्या ओळखीच्या  किमान दहा लोकांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या. त्यांना वाचक बनवण्यासाठी आम्ही जंग जंग पछाडू. ते शंभर लोकांना वाचक बनवतील. लाखांचे कोटी व्हायला कितीसा वेळ लागणार?

सर्व प्रकारच्या वाचकांसाठी आम्ही पुस्तकं बनवतो. बालसाहित्यापासून ते गूढ कथांपर्यंत आणि ज्ञानदेव तुकारामांच्या संत साहित्यापासून ते अगदी कामसूत्रापर्यंत. प्रत्येक तऱ्हेच्या वयाच्या, निवडीच्या, आवडीच्या वाचकासाठी आम्ही पुस्तकं बनवतो आहोत. अगदी कृषी आणि रेसिपी सुद्धा.

मित्रांनो. या अभिनव अभियानात सामिल व्हा.
दहा लोकांना वाचक बनवा.
दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला कळवा.

असे ई मेल आय डी पाठवणा-या  वाचकांना आम्ही **VIP** वाचक दर्जा देतो. .

आमचा पत्ता  :esahity@gmail.com
अधिक माहितीसाठी भेट द्या  :www.esahity.com

आपले नम्र
टीम ई साहित्य प्रतिष्ठान